'बाबाबुवा' यांच्या प्रतिमांना मी विरोध करु शकत नाही, इनकमटॅक्स वा बँकेत नोकरी करीत असेल तर तिथे असलेल्या लक्ष्मीच्या प्रतिमेला विरोध करु शकत नाही आणि मी जिथं अध्यापनाचं कार्य करतो तिथं महाद्वारातच सरस्वतीची प्रतिमा असेल तर तिलाही मी विरोध करणार नाही. मग माझा विरोध कशाला आणि कुठं असेल ? सुरक्षित राहून विरोध करता येईल अशा ठिकाणी ! आणि अशाच प्रश्नांना ! उदाहरणार्थ या देशाचा पंतप्रधान मला ओळखत नसल्यामुळे माझ्या जाहीर भाषणात त्यांच्या धोरणावर मी सडकून टीका करावी एवढं मला धाडस आहे. पण शाळेत गणपती बसवला जातो म्हणून त्याच शाळेत नोकरी करतांना मुख्याध्यापकाला मात्र विरोध करण्याचं धाडस मी करणार नाही. व्यक्तीस्वातंत्र्याच्या चळवळीतला हा असा पोकेपणा मला तीव्रतेनं जाणवत राहतो. अनेक व्याजप्रश्नांच्या रणभेरी माझ्या कानाचे पडदे फाडतात. मी कसे अवलोकन करावे समाजाचे वास्तव आणि कसे आकलनाच्या कक्षेत यावेत माझे प्रश्न ?

मित्र हो, एवढ्या गदारोळातही मला शांत राहून विचार करणे भाग आहे. कारण 'घाबरु नकोस मी तुझ्या पाठीशी नाही आहे' असं म्हणणारा कुणीच माझ्या पाठीशी नाही. आणि माझ्याच काय कुणाच्याही पाठीशी असा कुणी नसतोच ! जो असतो तो मागचे दोर संपवून टाकणारा केवळ अंधार ! आणि पुढं प्रश्नांचं अरण्य. मग कोण असतो आपला वाटाड्या ? असतो तो, आपल्या पुढं, आणि तोच आपणाला सांगत असतो 'अत्त दीप भव' तूच तुझ्या मार्गाचा प्रकाश हो.

मला कधी कधी अनेकजण नाटक वाचल्यावर, भाषण ऐकल्यावर प्रश्न विचारतात तुम्ही समतोल बोलता, तुम्हाला हे कसं जमतं ? जमतं ! कारण समतोल बोलणं हेच माझ्यावर लादलं गेलं आहे. पण ते माझं ओझं नाही. मला मानदंड वाटणाऱ्या महापुरुषानं ते माझ्यात मुरवलंय. तोल ढळेल अशी भाषा वापरुन मला टाळ्या मिळवता येतील, पण आयुष्यभर जो प्रकाश पकडण्याचा आपण ध्यास घेतला तोच हातून गळून पडेल त्याचं काय?

भाषेचा मुद्दा निघाला म्हणून इथंच मला कर्नाटकात घडलेल्या प्रकारावर बोलण्याची इच्छा आहे.

एखाद दुसऱ्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षाचा अपवाद सोडल्यास कर्नाटक-महाराष्ट्र सीमा प्रश्नाची चर्चा अध्यक्षीय भाषणात आलेली नाही. बेळगांव नगरपालिकेच्या बरखास्तीचे प्रकरण आणि माझ्या अध्यक्षपदाची घोषणा या दोन्ही घटना एकानंतर एक घडल्यामुळे पत्रकारांनी या प्रश्नावर माझी प्रतिक्रिया विचारली. माझ्या प्रतिक्रियेतील तीव्र नाराजीचा सूर मराठी पत्रकारांना दखल घेण्याइतका महत्त्वाचा वाटला. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात मी माझी भूमिका विशद करावी अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. म्हणून या प्रश्नाच्या संदर्भात एक लेखक या नात्याने मी माझी भूमिका विशद करणे माझे कर्तव्य आहे असे मला वाटते.